# 'गुरु पाठीराखा' आषाढ वारी दिंडी माहिती पट प्रदर्शन अहवाल

**दि.२१ जून २०२५ सायं. ०५:३० वा. स्थळ : सेमीनार हॉल**

**प्रस्तावना -**

'गुरु पाठीराखा' आषाढ वारी दिंडी माहितीपट प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वारकरी धर्मसंकीर्तन प्रतिष्ठान, कुंभारझरीच्या वतीने दरवर्षी आषाढी एकादशीला स्वग्राम ते पंढरपूर पायी दिंडी जाते. शनिवारी या दिंडीचा महाविद्यालयात मुक्काम होता. या निमित्त जे.ई.एस.महाविद्यालयातील मराठी विभाग आणि श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विविध सांस्कृतिक परंपरा असणाऱ्या भारतात प्राचीन काळापासून ज्ञानाची, साधनेची व भक्तीची परंपरा अखंड चालू आहे. भारतीय ज्ञानपरंपरेने जगाला आत्मज्ञान, योग, आयुर्वेद, संस्कार आणि धर्मशिक्षा यांचा ठेवा उपलब्ध करून दिला आहे. भारतीय ज्ञानपरंपरा हजारो वर्षांपासून चालत आलेली अनुभवाधिष्टीत आणि आचरण प्रधान परंपरा आहे. या परंपरेत वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, पुराने, दर्शनशास्त्र, योगशास्त्र नाट्यशास्त्र, आयुर्वेद, व्याकरणशास्त्र यांचा समावेश होतो.

**उद्देश -**

१. वारकरी पंथातील वारीची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करणे.
२. महाराष्ट्राची संस्कृती व वारी यांचा सहसंबंध समजून घेणे.
३. वारीचे स्वरूप व महत्त्व समजून घेणे.




*कार्यक्रम पत्रिका*

**तपशील -**

महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि मराठी विभाग जेईएस महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, कुंभारझरी तालुका जाफराबाद येथील पायी वारी दिंडी सोहळा महाविद्यालयात विश्रांतीसाठी थांबलेला होता. यानिमित्ताने गुरू पाठीराखा आषाढ वारी दिंडी माहितीपट प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष श्री. महेंद्रकुमार गुप्ता तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ साहित्यिक बसवराज कोरे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून लेखक,कवी,पत्रकार विनोद जैतमहाल व सुप्रसिद्ध कवी श्रीधर नांदेडकर होते. यावेळी फिल्म एडिटर अभिजित चव्हाण, संस्थेचे कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, संचालक विनोद अग्रवाल, दिंडी मार्गदर्शक हभप सोनुने गुरुजी, जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. **या कार्यक्रमास एकूण २५० वारकरी, ६० शहारातील नागरिक, १० विद्यार्थी, २० शिक्षक आणि ०५ इतर कर्मचारी उपस्थित होते.**

वारी ही भारतीय ज्ञानपरंपरेतील भक्तीपंथांचे जीवन रूप आहे. संत ज्ञानेश्वरांची ‘ज्ञानेश्वरी’, संत तुकारामांची ‘गाथा’ हे ग्रंथ म्हणजे शुद्ध ज्ञानसागर आहेत. या ग्रंथांच्या विचारांना कृतीत उतरण्याचे माध्यम म्हणजे वारी होय. भारतीय ज्ञान परंपरा ही आपल्या संस्कृतीची मेरुमणी आहे. पंढरपूरची वारी त्याची जिवंत अभिव्यक्ती आहे. वारी हा केवळ धार्मिक उत्सव नसून एक संस्काराचा आणि अध्यात्मिकतेचे महापर्व आहे. वारीतून प्रत्येक माणूस अध्यात्मिक समाधान, सामाजिक शिस्त आणि भक्तिमय जीवनशैली यांचे पाठ घेतो, हीच भारतीय ज्ञान परंपरेची खरी ताकद आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा संचित ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करण्याचे काम पंढरीच्या वारीने मागील शेकडो वर्ष केले आहे. काळाच्या ओघात वारीच्या स्वरूपात निश्चित बद्दल झाले असतील, मात्र वारीचा सेवाभाव शेकडो वर्ष कायम आहे. सत्य, सदाचार, प्रेम, शांती आणि सेवाधर्माचे आचरण दिंडीत सहभागी वारकऱ्यांमध्ये पाहायला मिळतात. कुठलेही लिखित नियमांशिवाय गेली अनेक वर्ष नियमबद्ध पद्धतीने सुरू असलेला दिंडी सोहळा हा महाराष्ट्र अनुभवतो आहे. याच आनंदाची अनुभूती घेण्यासाठी यंदा प्रत्यक्ष दिंडीत सहभागी

Mahila Mahavidyalaya JALNA

होण्याची संधी प्रत्यक्ष पांडुरंगाने आपल्याला उपलब्ध करून दिली असल्याचे मत सुप्रसिद्ध कवी श्रीधर नांदेडकर यांनी व्यक्त केले.




*सुप्रसिद्ध कवी श्रीधर नांदेडकर बोलताना*

पंढरीचा विठ्ठल हा तुमचा, आमचा सर्वांचा पाठीराखा आहे. वारीच्या रूपाने साक्षात पांडुरंग आम्हाला दर्शन देण्यासाठी आला आहे. दरवर्षी हा दर्शनाचा योग लाभावा अशी अपेक्षा संस्थेचे अध्यक्ष महेंद्रकुमार गुप्ता यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली.

जेष्ठ साहित्यिक प्रा.बसवराज कोरे यांनी आपल्या भाषणातून महाराष्ट्रातील फडकऱ्यांची परंपरा आणि दिंडीचा वारसा मोजक्या शब्दात समर्कपणे मांडला. सोनुने गुरूंच्या आयुष्यात अनेक चढउतार आले, मुळात आयुष्याची सुरुवात संघर्षाने झाली. अतिशय खडतर परिस्थितीत देखील मूल्यांशी तडजोड न करता गुरुजींनी जो आदर्श घालून दिला तो निश्चितपणे अनुकरणीय असल्याचे प्रा.कोरे म्हणाले.




*जेष्ठ साहित्यिक प्रा.बसवराज कोरे बोलताना*

पंढरीच्या दिशेने जाणाऱ्या वारीत सहभागी प्रत्येक वारकरी ही विठ्ठलाची वेगवेगळी रूपे आहेत. गुरु पाठीराखा या माहितीपटाचे चित्रीकरण करताना वारी आणि वारीत सहभागी वारकरी यांची वैशिष्ट्ये जवळून अनुभवता आली. कळत नकळत विठ्ठल भेटल्याचा भावना या माहिती पटाच्या निर्मिती दरम्यान आपल्याला अनुभवता आल्याचे मत गुरु पाठीराखा माहितीपटाचे लेखक, दिग्दर्शक विनोद जैतमहाल यांनी व्यक्त केले.




*श्री. विनोद जैतमहाल मार्गदर्शन करताना*

वारीत सहभागी प्रत्येक वारकरी हे विठ्ठलाचे एक रूप आहे. ज्यांना प्रत्यक्ष वारीत सहभागी होता येत नाही, त्यांनी वारीतील वारकऱ्यांची सेवा केली तरी वारीचे पुण्य मिळते असे मत प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी व्यक्त केले.




*प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री मनोगत व्यक्त करताना*

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वासुदेव उगले यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा.राहुल अंभोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभाग प्रमुख डॉ.वासुदेव उगले यांच्यासह महाविद्यालयातील मराठी

